# उत्पत्तीच्या पुस्तकातील कुलाधिपतीनी नमूद केलेली मुख्य सत्ये

मुलांना शिकविणाऱ्यांनी P2b1 हा अभ्यास वाचावा

## 1. देवाच्या वचनातून आपल्या अंत:करणाची व मनाची तयारी करा

हा अभ्यास तुम्हाला एकाच बैठकीत किंवा प्रत्येक आठवड्यात एक किंवा दोन कुलाधिपतींचा अभ्यास असा काही आठवडे करता येईल.

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभु, कुलाधिपतींकडून लोकांना सार्वकालिक सत्य कशा प्रकारे समजून घेता येईल हे शिकण्यास आमची मदत कर.''

**अ. आदामाने** पातक केले, नव्याने निर्माण केलेल्या जगात सैतानाने त्याला भुरळ घातली वाचा उत्पत्ती 1 ते 3 अध्याय.

- मुख्य सत्य: प्रत्येकजण पाप करतो कारण आदामाने पाप करून जगात पाप आणि मरण आणले. वाचा रोम 5:12-21.
- **चर्चेसाठी:** सैतानाने हव्वा बाईला भुलर्विले तेव्हा त्याने तिला कोणते अभिवचन दिले? पातक इतके आकर्षक मोहात पाडणारे का असते?


  (उत्तर: ती देवाप्रमाणे ज्ञानी होईल आणि मरणार नाही असे सैतानाने तिला खोटेच सांगितले.)



**ब. नोहाने** देवाच्या आज्ञेचे पालन करून पाण्यात तरंगणारी मोठी पेटी तयार केली. त्याला 'तारू' म्हणतात. यामुळे जलप्रलयात त्याचे कुटुंबिय आणि सर्व प्रकारच्या प्राण्यांचे रक्षण झाले, उत्पत्ती अध्याय 6-9.

- मुख्य सत्य: देव पापी मनुष्यांना शासन करतो; परंतु, त्याच्या आज्ञा पाळणाऱ्या राहिलेल्या लोकांचा बचाव करतो येशू पृथ्वीवरील शेवटच्या न्यायाची तुलना देवाने नोहाच्या काळात केलेल्या शिक्षेशी करतो, मत्तय 24:37-42.
- चर्चेसाठी प्रश्न: नोहाचे तारू हे येशूने परत जिवंत होऊन आम्हाला जीवन देणे याचे कशा प्रकारे प्रतिक होते?

  (उत्तर: ख्रिस्त आम्हाला नवीन जीवन देतो. आम्ही त्याचे शरीर आहोत. तारवामध्ये राहिल्याने नोहा व त्याचे कुटुंब यांचा मरण आणि शिक्षेपासून बचाव झाला, तितकेच आम्ही ख्रिस्ताच्या ठायी आहोत.)



**क. अब्राहामाने** देवाच्या अभिवचनांवर विश्वास ठेवला आणि देवाने त्याच्याशी महत्वपूर्ण करार केले. उत्पती अध्याय 12-26. अब्राहामाप्रमाणे सर्व राष्ट्रांतील लोक देवाच्या अभिवचनांवर विश्वास ठेवतात तेव्हा त्यांनाही आशीर्वाद मिळतात.

**पाहा** 12:1-7 मध्ये देवाने अब्राहामाच्या संततीद्वारे सर्व राष्ट्रांना आशीर्वाद देण्याचे अभिवचन दिले आहे.

**पाहा** अध्याय 14 मध्ये अब्राहामाने त्याच्या पुतण्याला लोटाला कैद करून नेणाऱ्या पाच मूर्तीपूजक राजांचा कसा पराभव केला.

**पाहा** अध्याय 15 मध्ये देवाने आश्चर्यकारक विधीच्याद्वारे आपल्या करारावर कसे शिक्कामोर्तब केले.

**पाहा** अध्याय 18 मध्ये अब्राहामाने लोट व त्याच्या कुटुंबासाठी प्रभूकडे कशी मध्यस्थी केली.

**पाहा** अध्याय 19 मध्ये देवाने दुष्ट सदोम शहराचा कसा नाश केला.

- **मुख्य सत्यः** देव आमच्या विश्वासामुळे आम्हाला स्वीकारतो, आमचा आध्यात्मिक पिता अब्राहाम याच्याशी तो असाच वागला, गलती 3:6-9.
- **चर्चेसाठी प्रश्नः** लोकांचे तारण विश्वासामुळे होते की ते सत्कृत्यें करतात आणि तारण होण्यास पात्र होतात म्हणून त्यांचे तारण होते?

  (उत्तर: इफिस 2:8-10 ह्या वचनांत सांगितले आहे की आमच्या सत्कृत्यांमुळे नाही तर देवाची दया आणि आमचा विश्वास यामुळे तो आमचे तारण करतो)

**ड. इसहाक** अब्राहाम व सारा ह्यांना अभिवचनाने देऊ केलेल्या ह्या मुलाचा अद्‌भुत रीतीने जन्म झाला, साराचे मूल होण्याचे वय केव्हाच उलटून गेले होते, उत्पत्ती अध्याय 21-28. अध्याय 22 मध्ये देवाने अब्राहामाला त्याच्या मुलाचे अर्पण करण्यास सांगितले. देव अब्राहामाच्या विश्व कसोटी पहात होता. देवाने अब्राहामाला अभिवचन दिले होते की इसहाक त्याचा वारीस होईल आणि एक दिवस देव त्याच्याद्वारे आपले अभिवचन पूर्ण करणार आहे.

**पाहा** अध्याय 24 मध्ये अब्राहामाचा सेवक एकाच देवावर विश्वास ठेवणारी मुलगी इसहाकासाठी पत्नी म्हणून शोधण्याकरिता कसा गेला.

- मुख्य सत्य: काही लोक संशय घेत असले तरी देव आपली अभिवचने नेहमीच पूर्ण करतो. अब्राहाम त्याला दिलेले संततीचे अभिवचन पूर्ण होण्याची वाट पाहून कंटाळला आणि मग त्याने देवाचे अभिवचन आपल्या स्वत:च्या प्रयत्नांनीच पूर्ण करण्याचा खटाटोप केला. परिणामी इश्माएलाचा जन्म झाला. अरब राष्ट्राच्या ह्या कुलाधिपतीने पुढे इस्लामची स्थापना करून आपल्या स्वत:च्या प्रयत्नांनीच लोकांचे तारण होते अशा खोट्या विश्वासाची ओळख करून दिली (गलती. 4:21-31).
- चर्चेसाठी प्रश्न:

  देवाने अब्राहामाच्या विश्वासाची कसोटी कशी पाहिली?

  (उत्तर: देवाने अब्राहामाला त्याच्या पुत्राचे अर्पण करण्यास सांगितले. अब्राहाम त्याची आज्ञा पाळण्यास तयार असल्याचे पाहिल्यावर देवाने इसहाकाच्या ऐवजी अर्पण करण्यासाठी एडका पाहून दिला. इब्री 11:17-19 मध्ये स्पष्ट केले आहे की इसहाकाला मेलेल्यातून उठविण्यास देव समर्थ आहे असा अब्राहामाने विश्वास ठेवला.)

  एडका कोणत्या प्रकारे ख्रिस्ताचे चित्र किंवा भविष्य सूचकता दाखवतो?

  (उत्तर: एडका हे निर्दोष अर्पण असून दुसऱ्याचे तारण होण्यासाठी त्याच्या रक्ताचे सिंचन केले जाई. हे जुन्या करारातील इतर अनेक लोक व घटनांप्रमाणेच ख्रिस्ताचे, तो या पृथ्वीवर येण्याच्या कितीतरी अगोदर, चित्रण आहे. येशू येईल तेव्हा त्याचा स्वीकार करण्यासाठी लोकांची तयारी व्हावी याकरिता ही उदाहरणे आहेत.)



**ई. याकोबाने** देवाचा आशीर्वाद मिळविला. देवाने याकोबाचे नाव बदलून इस्राएल ठेविले. त्याच्या बारा पुत्रांची संतती पुढे इस्राएलाचे बारा वंश झाले, उत्पत्ती अध्याय 25-49.


**पाहा** 25:21-34 आणि अध्याय 27 मध्ये याकोबाने आपल्या थोरल्या भावाचा एसावाचा जन्मसिद्ध हक्क फसवून कसा घेतला, यामुळे त्याला अनुवाद 21:15-17 नुसार वारशाचा दुप्पट वाटा मिळाला.

- **मुख्य सत्य:** देवाची कृपा आणि प्रेमाने केलेली क्षमा ह्या गोष्टी काही आमच्या सत्कृत्यांवर अवलंबून नाहीत. याकोबाने खोटेपणा केला तरी त्याला देवाचे आशीर्वाद मिळाले, रोम 9:1-16 मध्ये स्पष्ट केल्या प्रमाणे.
- **चर्चेसाठी प्रश्न:** याकोबाने कोणत्या वाईट आणि चांगल्या गोष्टी केल्या? (उत्तर: याकोबाने एसावाच्या भुकेचा फायदा घेऊन त्याचा जन्मसिद्ध हक्क हा हक्क ज्येष्ठ पुत्राचा असतो आणि मालमत्तेचा दुप्पट वाटा हिरावून घेतला. त्याने चांगल्या गोष्टीही केल्या, त्याने भक्तीभावाने देवाची उपासना केली आणि आपली प्रिय पत्नी राहेल मिळेपर्यंत अनेक वर्षे काम केले)

**फ. योसेफाच्या** मत्सरी भावांनी त्याला गुलाम म्हणून विकले, उत्पत्ती अध्याय 37-50. त्याच्या भावांनी त्याला विकून टाकले आणि हिंस्त्र पशुने त्याला खाल्ले असे आपल्या वडिलांना याकोबाला सांगितले इतरांनी योसेफावर खोटे आरोप केले आणि त्याला तुरूंगात टाकले उत्पत्ती अध्याय 39. पुढे देवाने योसेफाला मिसरमध्ये मोठ्या पदावर चढविले कारण तो देवाच्या समागमे चालत असे, उत्पत्ती अध्याय 40-41. यानंतर योसेफाने आपल्या भावंडांचे व त्यांच्या कुटुंबियांचे प्राण दुष्काळापासून वाचविले, उत्पत्ती अध्याय 42-45.

- **मुख्य सत्य:** देव आपल्या लोकांचे, त्यांच्या भाऊबंदांच्या द्वारे, तसे करण्याचा अधिकार असणाऱ्या नातेवाईका करवी, रक्षण करतो. ख्रिस्त, आमचे तारण व्हावे म्हणून मरण पाविलेला निर्दोष मनुष्य, आमचा आप्त आहे. इब्री. 2:10-18.
- **चर्चेसाठी प्रश्न:** योसेफाचे जीवन ख्रिस्ताच्या जीवानाशी कशाप्रकारे जुळणारे आहे?

  (उत्तर: योसेफ हा ''इस्राएलच्या (याकोब) मुलांपैकी'' एक आरंभीचा एक होता. त्याच्या वडिलांचे त्याच्यावर खूप प्रेम होते. तो आज्ञाधारक होता. त्याच्या स्वत:च्याच लोकांनी त्याला विकले (जसे यहूदाने येशूचा सौदा केला). त्याला मिसराला नेण्यात आले. त्याच्यावर खोटे आरोप ठेवून कैदेत ठेविले. त्याला पदावरून काढले. त्याने त्याला नाकारणाऱ्या त्याच्या भावांचे प्राण वाचविले. एका मोठ्या मेजवानीच्या प्रसंगी त्याने दिमाखदारपणे स्वत:ला प्रकट केले).



**2. सहकाऱ्यांशी चर्चा करून तुम्ही व विश्वासणारे पुढील आठवड्यात काय करणार त्याची योजना आखा.**

तुमच्या लोकांनी दोन वा तीन जणांचे गट करून अद्याप येशूची ओळख नसलेल्या त्यांच्या मित्रमंडळीची व नातेवाईकांची भेट घेण्याची योजना आखा. कुलाधिपतींचे वृत्तांत सांगण्यास त्यांना मदत करा.

**3. येणाऱ्या उपासनेच्या संबंधात तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करा.**

मंडळीला कुलाधिपतींचा इतिहास सांगा. वर कुलाधिपतींचे वृत्तांत सारांशरूपाने कुलाधिपतींचा इतिहास सांगा-वर कुलाधिपतींचे वृत्तांत सारांशरूपाने थोडक्यात दिले आहेत. त्यातील एक किंवा अधिक कुलाधिपती निवडून त्याबद्दल मंडळीला सांगा.

**स्पष्ट करा** कुलाधिपतींसंबंधी 'मुख्य सत्ये' (वर दिलेली).

चर्चेसाठी दिलेले प्रश्न (वर) विचारा लोकांनी त्यांचे विचार मांडल्याशिवाय उत्तर देऊ नका.

**पाठ करा** उत्पत्ती 15:6.

मुलांना त्यांनी तयार केलेले कार्यक्रम सादर करू द्या.

प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी, योसेफाने, त्याला गुलाम म्हणून विकणाऱ्या आपल्या भावंडांसाठी मेजवानी दिली याचे स्पष्टीकरण करा. भावांनी त्याला ओळखले नाही. त्याने त्यांना क्षमा करून आपली ओळख दिली. आपणसुद्धा गौरवात येशूबरोबर मेजवानी करणार आणि त्याला समोरासमोर पाहणार आहोत.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net